# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन मुंबई यांचे कार्यालय

एस.आर.अे.बिल्डींग, अे-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा(पू), मुंबई-४०० ०५१.
कार्यालय फोन व फॅक्स क्र: ०२२-२६५९१५८६, E-mail: dcfmangrovecell@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ३३ /सन २०१७-१८
बांद्रा, मुंबई ४०० ०५१ दिनांक: १३ /०६/२०१८.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **१५** वी बैठक दिनांक **३१/०५/२०१८** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची १५ वी मासिक बैठक दि.३१/०५/२०१८ च्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.**

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | a) श्री.अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220)<br>b) श्री. फ्रान्सिस डिसोजा:- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | या तक्रारी संदर्भात उपस्थित जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनीधींनी या विषयासंदर्भात पुढील सुनावणी दि.१४/०६/२०१८ रोजी असल्याचे सांगितले. परंतु सदर विषय हा बऱ्हेच महिने प्रलंबित असल्याने समितीने सदस्य सचिवांना जिल्हाधिकारी पालघर यांना पत्र पाठवून या विषया संबंधित खुलासा सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी, पालघर व सदस्य सचिव |
| २ | a) श्री. कुलदिप चौधरी (मौजे नायगाव जि. पालघर )<br>b) श्री. अनिकेत स. वाडीवकर (आगाशी ता. वसई जि. पालघर)<br>c) श्री. मॅकेन्झी डांबरे (भुईगांव, वसई जि. पालघर)<br>d) श्री. स्टॅलिन डी (आगाशी ता. वसई जि. पालघर) | समितीने सदर जागेचे Restoration करुन जागेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल,छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्याबाबत दि.२७.०२.२०१८ च्या बैठकीत सांगितले होते. या तक्रारी संदर्भात समितीने सदस्य सचिवांना जिल्हाधिकारी पालघर यांना पत्र पाठवून या विषया संबंधित खुलासा सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी, पालघर व सदस्य सचिव |
| ३ | **श्री. रोहित जोशी :-** (स्वामीसमर्थमार्ग.कोपरी ठाणे.पुर्व) | या तक्रारी संदर्भात समितीने दि.२४/०४/२०१८ च्या बैठकीत उपस्थित प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण अधिकारी यांना सदर जागेवर सी.सी.टी.व्ही कॅमेरा आणि सूचना फलक लावण्याचे आदेश दिले होते जेणेकरुन तेथे कोणत्याही वाहन पुन्हा डेब्रिज टाकणार नाही. त्यानुसार ठाणे महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवाल सादर केला. ठाणे महानगरपालिकेकडून सिटी वायफाय प्रकल्पाअंतर्गत शहरात विविध ठिकाणी पोलिसांकडून सूचविलेल्या जागेवर कॅमेरे बसविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने कोपरी येथील स्वामी समर्थ परिसरात कॅमेरे बसविण्याची शिफारस करण्यात आलेली असून पोलिसांच्या मदतीने सदर ठिकाणी कॅमेरे बसविण्यात येतील. तसेच सदर परिसरात पुन्हा डंपरने अनधिकृत डेब्रिज टाकण्यात येऊ नये यासाठी वाहतुक विरोधक Bolard जागेवर लावण्याचे काम चालू केले आहे असे अहवालानुसार समितीला सांगितले. सदर विषय हा पुढील बैठकीपासून वगळण्यात येत आहे. | ठाणे महानगरपालिका |
| ४ | New Link Road Residence Forum, Dahisar West :- | याबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी बोरीवली न्यायालयाच्या आदेशानुसार पॅन इंडिया वर पुन्हा गुन्हा दाखल करता येणार नाही असे मागील बैठकीत सांगितले होते. त्या अनुषंगाने समितीने | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना संबंधित न्यायालयाचे आदेश आणि या बाबतचा सुपूर्ण अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी पश्चिम उपनगरे यांना दिलेल्या दि.१३.०३.२०१८ च्या आदेशाची प्रत सदस्य सचिव यांना प्राप्त आहे तसेच जागेचे Restoration चे काम विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या सूचनेप्रमाणे चालू करण्यात यावे असे सांगितले. सदरचा विषय हा पुढील बैठकीपासून वगळण्यात यावा. | |
| ५ | **धीरज परब:-**<br>ईमेलद्वारा प्राप्त अर्ज | या तक्रारी संदर्भात उपस्थिती अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी श्री. धिरज परब यांच्याकडून प्राप्त तक्रारींपैकी तीन जागेवर स्थळ पहाणी करण्यात आली असून उर्वरित जागेवरील स्थळ सूरु असल्याचे सांगितले. समितीने या संबंधी ज्या ६ तक्रारी प्राप्त आहेत त्या जागेवर स्थळ पहाणी करुन प्रत्येक तक्रारीचा वस्तूस्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी पुढील बैठकीमध्ये या संबंधी अहवाल सादर करु असे समितीला सांगितले होते. तथापि आजपर्यंत अहवाल प्रलबित असल्याने समितीने या बाबत उपस्थित प्रतिनीधीं यांना त्वरीत पुर्तता करण्याच्या सूचना देण्यात आल्या. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका. |
| ६ | **श्री. नंदकुमार पवार:-**<br>(बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात उपस्थिती प्रतिनिधींनी सदर जगेवर स्थळ पहाणी करुन FIR दाखल करण्यात आली आहे असून या बाबतचा अहवाल जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून जागेची FIR प्रत आणि केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती घेण्याबाबत सदस्य सचिवांना सांगितले. तसेच सदर जागा Restore करण्यासाठी उपवनसंरक्षक ठाणे यांच्याकडे पत्र पाठविण्यात आले आहे, त्या बाबतचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे त्यानुसार समितीने उपवनसंरक्षक ठाणे यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिवांना विचारणा करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे, उपवनसंरक्षक ठाणे व सदस्य सचिव |
| ७ | **श्री. नंदकुमार पवार :-**<br>**Water reclamation at Bhandup,east opposite menon college.**<br>(स्थळ:- भांडूप (पूर्व), मुंबई) | या तक्रारी संदर्भात मागील बैठकीत सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या अहवालानुसार सहाय्यक अभियंता (घकव्य) यांनी एस विभागातर्फे दोन उपद्रवशोधक व दहा हंटर सिक्युरिटीचे मार्शल घेऊन दररोज १०.३० ते ६.३० पर्यंत रात्रपाळी मध्ये नियुक्ती केलेली आहे. तसेच अनधिकृतरित्या डेब्रिज डंपिंग थांबविण्याबाबत वरिष्ठ | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पोलिस निरिक्षक कांजूर स्टेशन यांना देखील पत्र पाठविण्यात आलेले आहे तसेच सदर भूभाग हा उप अधिक्षक (मिठागरे) यांच्या अखत्यारित येत असल्याने त्यांच्यामार्फत सुध्दा भूभागावर भरणी होऊ नये म्हणून या जागेवर लक्ष ठेऊन कारवाई करण्यास सांगितले आहे असे बैठकीत सांगितले. त्या अनुषंगाने समितीने हा विषय पुढील बैठकीपासून वगळण्यात यावा असे सांगितले. | |
| ८ | **श्री. नंदकुमार पवार:-** Distruction and reclamation of mangroves and Wetlands at Dronagiri Node, Uran. | या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवर अद्याप स्थळपहाणी न झाल्याने तक्रारदारास संपर्क करुन दोन दिवसात स्थळ पहाणी करुन या बाबतचा अहवाल दि.२ जून २०१८ **पर्यंत** सादर करु असे समितीच्या बैठकीत सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड आणि सिडको |
| ९ | **अज्ञात व्यक्ती - KW2** Lots of trucks dumpers dumping the red clay in Mangrove. (स्थळ:- सेक्टर-२३ घनसोली, नवी मुंबई ) | या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवरील डेब्रीज हटविण्याचे काम पूर्ण झाले आहे असे सांगितले त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने सिडको यांना सांगितले. तसेच सदर जागेच्या Restoration ची आवश्यकता असल्यास मुंबई कांदळवन संधारण घटक यांची मदत घेण्याबाबत सदस्य सचिवांनी सिडको यांच्या प्रतिनीधींना सांगितले. | सिडको |
| १० | **श्रीमती मिनल देसाई** **Complaint ID No- KW4** विषय:- Petrol boat is being run at Dhamapur Lake. (स्थळ :- धामापूर जि.सिंधुदुर्ग) | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या उपस्थिती प्रतिनीधींनी त्यांच्या अहवालानुसार सदर विषय हा NGT अंतर्गत येत असल्याने सदर तक्रार बंद करण्याबाबत सांगितले आहे. त्यानुसार समितीने सदर तक्रार ही पुढील बैठकीपासून वगळण्यात यावी असे सांगितले. | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग |
| ११ | **तकारदार श्री. अक्षय पाटील** **Complaint ID No- KW5** Website द्वारा तक्रार प्राप्त दि.१२.०२.२०१८ - विषय:- Illegal mangrove cutting (स्थळ :- विटावा ता. जि. ठाणे) | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिकेने अहवालानुसार सदरजागेची NWIA वर पुन्हा पडताळणी केली असता सदर जागा पाणथळ नसल्याचे दिसून येते. नमूद स्थळ पहाणी अहवालावर तक्रारदारांची स्वाक्षरी घेण्यासंदर्भात तक्रारदारांशी चर्चा केली असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, कांदळवन कक्ष, पोलिस विभाग यांचे प्रतिनिधीची त्यांच्या उपस्थितीत वेळ घ्यावी व त्या अनुषंगाने पुन्हा स्थळ पहाणी करण्यात येईल असे ईमेल दि.२४/०५/२०१८ रोजी कळविले आहे असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने या संदर्भात मंगळवार दि.५/०६/२०१८ रोजी एकत्र स्थळ पहाणी करण्यास सांगितले. | जिल्हाधिकारी, ठाणे आणि महानगरपालिका ठाणे |
| १२ | **श्रीमती श्वेता भट** दि.०६.०२.२०१८ Destriction of mangrove behind Hiranandani, Kavesar, Thane. | | |
| १३ | **तकारदार श्री. स्टॅलिन डी** Email द्वारा तक्रार प्राप्त | श्री. स्टॅलिन यांनी JVLR ला लागून असलेले जे दोन गेट आहेत ते बंद करण्याबाबत सांगितले जेणेकरुन त्या | मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.१५.०२.२०१८<br>विषय :- Illegal dumping on wetlands along JVLR and Eastern express highway<br>(स्थळ :- जोगेश्वरी विक्रोळी रोड, मुंबई) | ठिकाणी डेब्रिज पुन्हा जमा होणार नाही. त्यानुसार समितीने मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेवरील गेट बंद करण्याबाबतच्या सूचना दिल्या. | |
| १४ | **श्री. धिरज परब**<br>भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास झाल्याबाबत.<br>स्थळ :- भाईंदर पश्चिम, जि.ठाणे. | या तक्रारी संदर्भात उपस्थिती अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी स्थळ पहाणी दरम्यान सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण झाले असल्याचे सांगितले ते पुन्हा हटविण्यात येईल असे सांगितले. सदर जागा ही काही सॉल्ट विभागाची आणि सरकारी असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने सदर जागा ही ज्या कोणाच्या मालकिने असेल त्यास पत्राद्वारे कळवून सदर जागेचे संरक्षण करण्यास सागितले. त्यानुसार समितीने अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना या तक्रारी संदर्भात लेखी अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी देण्याबाबतचे आदेश दिले. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| १५ | **श्री. धिरज परब**<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत.<br>स्थळ :- भाईंदर पश्चिम जि. ठाणे. | या तक्रारी संदर्भात समितीने सदर जागेवर डेब्रिज टाकण्यात आले असून अद्याप FIR दाखल का केली नाही या बाबत अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना विचारणा केली असता त्यांनी या बाबत स्वत: स्थळ पहाणी करुन या बाबतचा अहवाल सादर करु असे बैठकीत सांगितले. त्या नुसार समितीने तक्रारदार व श्री. स्टॅलिन यांच्या सोबत स्थळ पहाणी करुन सदर तक्रारीबाबत प्राधान्याने कार्यवाही करुन त्या बाबतचा लेखी अहवाल समितीपुढे सादर करावा असे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला सांगितले. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| १६ | **तक्रारदार अभिव्यक्ती गृप**<br>**Please save Secctor 19 Pond**<br>स्थळ:- सेक्टर १९ खारघर, नवी मुंबई.<br><br>**श्री. नरेशचंद्र सिंघ**<br>**टिप्पणीतील मुद्दा क्र. १८**<br>Please Immediately stop the Destruction of Mangroves, water bodies and wetland in Kharghar. | या तक्रारी संदर्भात दि.२४/०४/२०१८ च्या बैठकीत दिलेल्या सूचनेप्रमाणे सिडकोने कोणताही अहवाल सादर केलेला नाही. सिडको यांना सदर जागेवर पाणथळ नसल्याची भूमिका मांडली व सदर जागेवर कोणत्याही प्रकारची हानी झालेली नाही असेही त्यांनी बैठकीत सांगितले. सदर जागेवर पुन्हा कोणी डेब्रिज टाकणार नाही असे सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितले. सदस्य सचिवांनी सदर जागेवर Wetland आहे किंवा नाही या बाबत पुन्हा तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करण्याबाबत समितीने सांगितले व त्या बाबतचा अहवाल तात्काळ मंगळवार दि.५ जून २०१८ रोजी सादर करण्याबाबत सिडको यांना सांगितले. | सिडको |

<table>
<tr><td>१७</td><td>श्री. स्टॅलिन डी<br>Massive illegal reclamation of coastal wetland at Mumbra by Thane Municipal corporation.</td><td>या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालानुसार तक्रारदारासोबत दि.२९/०५/२०१८ रोजी स्थळ पहाणी केली. पहाणीच्या वेळी तक्रारदारांनी Mudflat वरचे भराव काढून टाकणे व Mudflat Restore करण्याबाबत सूचना दिल्या त्यानुसार ठाणे महानगरपालिकातर्फे काम सुरु करण्यात आले आहे असे सांगितले. सदर काम हे पावसापूर्वी करण्याबाबत समितीने सांगितले.</td><td>जिल्हाधिकारी ठाणे आणि आयुक्त महानगरपालिका ठाणे.</td></tr>
<tr><td>१८</td><td>श्री. विनादे पुन्शी<br>Debris turns Nerul pond into Cricket ground & Another Navi Mumbai water body on the verge of being encroached - TOI Navi Mumbai dated 04/04/18.</td><td>या तक्रारी संर्भात नवी मुंबई महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालानुार तक्रारदार यांनी नमुद करण्यात आलेल्या ठिकाणी या पुढे डेब्रिजचे वाहन जाऊ नये याकरिता वाहन ये-जा करण्याच्या भागात मातीचे ढिग व चर मारुन रस्ता बंद करण्यात आला आहे. तसचे ६ फुट उंचीचे सिमेंट कॉंक्रीट पाईप आडवे लावून मार्ग बंद करण्यात आलेले आहे तसेच सदर ठिकाणी डेब्रिज टाकण्यात येऊ नये या करीता तीन सत्रामध्ये गस्त घालण्यात येत आहे व यापूढे जर सदर ठिकाणी डेब्रीज टाकताना आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे बैठकीत सांगितले. त्या अनुषंगाने समितीने सदस्य सचिवांना योग्य रित्या तपासणी करुन ही तक्रार पुढील बैठकीतून वगळयात यावी असे सांगितले.</td><td>नवी मुंबई, महानगरपालिका</td></tr>
<tr><td>१९</td><td>इतर विषय</td><td>१) समितीच्या अध्यक्षांनी दि.२१.१२.२०१७ च्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे सुचित केले की प्रत्येक जिल्हयातून त्या वन विभागाशी सल्लामसलत करुन कमीत कमी एक अशी योग्य त्या वेटलॅन्ड क्षेत्राची निवड करावी जी जैवविविधतेने व पर्यावरणीयदृष्टया महत्वाची आहे. जेणेकरुन स्थानिक नागरीकांच्या सहाय्याने वेटलॅंन्ड क्षेत्र पर्यटन स्थळ (Eco-Tourism) म्हणून विकसीत करता येईल. प्राप्त जिल्हयांची माहिती पुढील तकत्यात दिली आहे.
<table>
<tr><th>जिल्हा</th><th>निवडलेले पाणथळ क्षेत्र</th></tr>
<tr><td>ठाणे</td><td>रेती बंदर, पारसिक</td></tr>
<tr><td>मुंबई उपनगर</td><td>बोरीवली</td></tr>
<tr><td>मुंबई शहर</td><td>-</td></tr>
<tr><td>रायगड</td><td>मुरबे खालापूर व फेटवणे</td></tr>
<tr><td>रत्नागिरी</td><td></td></tr>
<tr><td>सिंधुदुर्ग</td><td>पावशी ता. कुडाळ मुळदे धरण</td></tr>
<tr><td>पालघर</td><td>पानजु ता. वसई</td></tr>
</table>
रत्नागिरी जिल्हयातून कोणीही प्रतिनीधींनी उपस्थित नव्हते. त्यानुसार समितीने त्यांना योग्य पाणथळ जागा सूचविण्यास सांगितले.</td><td>सर्व जिल्हाधिकारी</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| २० | **तक्रारदार श्री. झोरु भातेना**<br>विषय :- Illegal dumping on low lying CRZ-II NDZ land at CTS No 229A of Village Anik, in M/West Ward, by Mumbai Metro 3 (MMRCL) | सदर तक्रार ही जिल्हाधिकारी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याबाबत समितीने सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई |
| २१ | **तक्रारदार श्री. धिरज परब**<br>मीरा भाईंदर महापालिकेने आरक्षण क्र. १२२ डी – दफनभूमी प्रकरणी MCZMA ची तद्यन फसवणूक व दिशाभूल करुन घेतलेली मंजूरी रद्द करणे. | या तक्रारी संदर्भात अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना चौकशी करुन या बाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याबाबत समितीने सांगितले. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| २२ | **तक्रारदार नरेशचंद्र सिंघ**<br>विषय:- Urgently Declare Wetlands of Sector 17 and 19 Kharghar "No Development Zone"! | या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन या बाबतचा लेखी अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यास सांगितले. | सिडको |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

उप आयुक्त (महसुल)
कोकण विभाग

अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रारनिवारण समिती
तथा
विभागीयआयुक्तकोकण विभाग